# प्रात्यक्षिक २ : तालिकीकरण (अँग्लो–अमेरिकन कॅटलॉगिंग रूल्स–2R २००५, अद्ययावत आवृत्ती)

**तालिकीकरण :** वाचन साहित्य तालिकीकरणाचे नियम

ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध वाचन साहित्याची माहिती वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी ग्रंथालय तालिका निर्मितीची गरज असते. वाचन साधनांची तालिका तयार करणे हे प्रत्येक ग्रंथालयाचे मूलभूत कार्य आहे व ग्रंथालय तालिकेस ग्रंथालयाच्या वाचन साहित्याचा आरसा म्हणून पहिले जाते. प्रत्येक वाचक ग्रंथालयात आल्यावर त्याला हव्या असलेल्या वाचन साहित्याचा शोध तालिकेतून घेतो. यामुळे त्यास विशिष्ट ग्रंथाची उपलब्धता समजते.

**तालिका व्याख्या**

सी.ए.कटर यांच्यामते, 'ग्रंथालय तालिका म्हणजे ग्रंथालयातील वाचन साधनांची यादी. तालिकेतील नोंदींची रचना विशिष्ट पद्धतीने व नियमानुसार केलेली असते.'

डॉ. रंगनाथन यांच्या मते, 'ग्रंथालय तालिका म्हणजे ग्रंथालयातील ग्रंथ आणि इतर ग्रंथेतर वाचन साधनांची यादी होय. यातील नोंदींची रचना विशिष्ट क्रमाने करून त्यामध्ये सूचीय माहितीचे वर्णन केलेले असते. या तालिकेचा उद्देश ग्रंथालयातील वाचन साहित्याचा शोध व ग्रंथालयातील त्याचे स्थान कुठे आहे ते वाचकास माहित करून देणे.'

थोडक्यात, तालिका ही ग्रंथालयातील वाचन संग्रहाची मार्गदर्शिका होय, जी तालिका नियमांच्या आधारे तयार केली जाते.

तालिका संहितांचा उगम, विकास व विविध मानके कशी विकसित झाली हे आपण तालिकीकरण तात्त्विक विभागात अभ्यासले आहे. या प्रात्यक्षिक विभागात आपण अेअेसीआर – २R, २००५ अद्ययावत आवृत्तीनुसार निवडक महत्वपूर्ण वाचन साधनांच्या तालिकीकरणाचे नियम अभ्यासणार आहोत. त्यामध्ये पुढील प्रकारच्या ग्रंथांच्या तालिका नोदींचे नियम आहेत :

(i) एक लेखक ग्रंथ

(ii) दोन लेखक ग्रंथ

(iii) तीन लेखक ग्रंथ

(iv) तीन पेक्षा जास्त लेखक असलेला ग्रंथ

(v) संपादित केलेला ग्रंथ

ग्रंथालय तालिकेचा मुख्य उद्देश म्हणजे जर वाचकास ग्रंथाविषयी खालीलपैकी कोणताही एक घटक माहित असेल तर तो ग्रंथ ग्रथालयात उपलब्ध आहे किंवा नाही व असल्यास त्याचे स्थान कोठे आहे हे शोधण्यास मदत करणे होय.

(i) लेखक

(ii) ग्रंथनाम/ग्रंथशीर्षक

(iii) विषय

(iv) संपादक / भाषांतरकार

(v) संकलक इत्यादी

**तालिकीकरणाचे नियम:**

माहितीशोध घटक निवड (Choice of Access point)

प्रत्येक ग्रंथाची तालिका नोंद करताना सर्वसाधारणपणे दोन प्रकारच्या नोंदी केल्या जातात – मुख्यनोंद (Main Entry), व पूरक नोंदी (Added Entries). अेअेसीआर नुसार अशा नोंदी करताना माहितीशोध घटकांची निवड या विषयी विविध नियम प्रस्तुत केले आहेत. यामुळे तालिका वापरण्याची व्याप्ती वाढली आहे. तसेच माहितीचा शोध घेणेही सुकर झाले आहे. तालिकाकार तालिका नोंदी करताना खालील घटकांचा समावेश करतो.

(i) ग्रंथकार नाम/लेखकाचे नाव/नावे

(ii) ग्रंथनाम / ग्रंथशीर्षक

(iii) सहकारी लेखक, संपादक, भाषांतरकार इ.

(iv) मालानाम व

(v) विषयशीर्षक नोंद

**मुख्यनोंद (Main Entry) :** मुख्यनोंद ही वाचन साधनाची पूर्ण नोंद होय. तसेच मुख्य नोंदीमध्ये पूरक नोंदींकरीता शोध घटक (Tracing) नोंदविले जातात. मुख्य नोंद ही साधारणपणे लेखक किंवा समष्टी संस्था ग्रंथकाराच्या नावाने, जे प्रलेखातील माहितीस जबाबदार असतात, त्यांच्या नावाने केली जाते. काहीवेळेस मुख्य नोंद ही ग्रंथशीर्षक नावाने/ग्रंथनामाने केली जाते. प्रसंगी ही नोंद संपादक, भाषांतरकार, संकलक यांच्याही नावाने केली जाते. मुख्य नोंदीतील सूचीय माहिती घटक खालील प्रमाणे.

(i) बोधांक

(ii) शीर्षक (Heading indicating Authors) मुख्य जबाबदार व्यक्ती अथवा समष्टी संस्था

(iii) प्रकाशक, प्रकाशन स्थळ व प्रकाशन वर्ष (Imprint)

(iv) ग्रंथवर्णन संदर्भातील तपशील (Collation = physical description):

(v) टीपा (Notes): ग्रंथाविषयी थोडक्यात अधिकची माहिती, जी वरील वर्णनात समाविष्ट नसते, अशी माहिती.

(vi) पूरक नोंदींचे शोध घटक (Tracing) हे मुख्य नोंदीच्या तालिका पत्राच्या मागील बाजूस नोंदवले जातात.

**पूरक नोंदी (Added Entries) :** ह्या नोंदी मुख्य नोंदीव्यतिरिक्त तयार केल्या जातात. या नोंदीच्या सहाय्याने ग्रंथाचे सविस्तर वर्णन करून तालिका तयार केली जाते. अशा पूरक नोंदी ह्या मुख्य नोंदीस साहाय्यक म्हणून कार्य करतात. काहीवेळेस पूरक नोंदींना दुय्यम नोंदी असेही संबोधले जाते. ह्या नोंदींमुळे वाचकास अधिक ग्रंथशोध घटक (Access points) प्राप्त होतात. ह्या नोंदीमध्ये सहाय्यक लेखक, भाषांतरकार, संपादक, ग्रंथनाम, माला नोंदी आणि विषय शीर्षक नोंदी यांचा समावेश होतो.

**मुख्यनोंदीतील विविध भागांची संक्षिप्त ओळख:** मुख्य नोंद करताना विविध घटकांमध्ये ग्रंथांविषयीची सूचीय माहितीची नोंद तालिकाकारास करावी लागते. यामध्ये समाविष्ट माहिती घटक खालील प्रमाणे:

(i) अग्रभाग (Heading/शीर्षक) : यामध्ये लेखक किंवा समष्टी संस्था यांच्या नावाची नोंद किंवा त्यांच्या अनुपस्थितीत ग्रंथनामाची नोंद

(ii) नोंदीचे मुख्य भाग

पहिला परिच्छेद

इफ्लाच्या 'कमिटी ऑन कॅटलॉगिंग ISBD रिव्हयू कमिटी वर्किंग ग्रुप, १९९२' ने मुख्य नोंदीचे प्रमुख आठ घटक ग्रंथाच्या सूचीय वर्णनासाठी निश्चित केलेले आहेत. ते पुढील प्रमाणे:

(१) ग्रंथनाम आणि ग्रंथातील आशयाची जबाबदारी असलेली व्यक्ती (Title and statement of responsibility area)

(२) आवृत्ती विभाग (Edition area)

(३) वाचन साधन विभाग (Material or type of publication specific area)


(४) प्रकाशन आणि वितरण इ. विभाग (Publication and distribution etc. area)

(५) ग्रंथाच्या पृष्ठांसंदर्भात व आकारासंबंधीचा विभाग (Physical description area)

(६) माला विभाग (Series area)

(७) टीपा विभाग (Note area)

(८) आयएसबीएन (ISBN area)



**नियम क्र.१ OD :** नोंदीतील विविध घटकांच्या जागा व नोंदी अेअेसीआर-2R, २००५ च्या अद्ययावत आवृत्तीनुसार पुढीलप्रमाणे :

**१. वर्गांक :** वर्गांक हा समासामध्ये तालिका पत्राच्या वरील बाजूकडून तिसऱ्या किंवा चौथ्या ओळीवर लिहावा. वर्गांक मोठा असल्यास तो समासात न लिहिता तालिका समासाच्या वरच्या भागात लिहावा.

**२. ग्रंथांक :** ग्रंथाक हा वर्गांकाच्या खाली चौथ्या ओळीवर अथवा पाचव्या ओळीवर (जर वर्गांक चौथ्या ओळीवर लिहिला असेल) लिहावा.

**३. दाखल अंक :** दाखल अंक तालिका पत्राच्या पहिल्या समासात सातव्या ओळीवर तालिका पत्राच्या डाव्या बाजूकडून एक स्पेस सोडून लिहावा.

**४. मुख्य नोंदींचे शीर्षक :** लेखकाचे नाव हे, पहिल्या समासापासून सुरू होते. (तालिकापत्राच्या डाव्या बाजूच्या कडेपासून नऊ स्पेसेस सोडून). म्हणजेच पहिल्या उभ्या रेषेपासून सुरूवात करावी. लेखकाचे नाव मोठे असल्यास पहिली ओळ न पुरल्यास ते खालच्या ओळीवर तिसऱ्या समासापासून लिहावे. तिसऱ्या समासाची ओळ तालिकापत्रावर छापलेली नसते. ती कल्पनेने गृहित धरून लिहावे (तालिका पत्राच्या डाव्या बाजूपासून १५ स्पेसेस नंतर तिसरा समास सुरू होतो). जर मुख्य नोंदीचे शीर्षक हे ग्रंथाचे शीर्षक (Title) असेल तर लंब समासाचा (Hanging indention) उपयोग केला जातो.

**५. ग्रंथाचे शीर्षक (Titile of the book) :** लेखकाच्या नावानंतरच्या ओळीवर दुसऱ्या समासापासून ग्रंथाचे शीर्षक लिहावे. (तालिका पत्राच्या डाव्या बाजूपासून १३ स्पेसेस). यानंतर ग्रंथलेखकाचे नाव ग्रंथाच्या शीर्षक पृष्ठावर जसे दिले असेल तसे लिहावे. यानंतर ग्रंथाची आवृत्ती. आवृत्तीनंतर ग्रंथ संपादित असल्यास संपादकाचे नाव, भाषांतरीत असल्यास भाषांतरकाराचे नाव, यानंतर प्रकाशन स्थळ, प्रकाशक, व प्रकाशन वर्ष लिहावे.

**६. ग्रंथवर्णन तपशील :** तालिका पत्राच्या वरील पहिल्या परिच्छेदानंतर (Paragraph) दुसरा परिच्छेद ग्रंथाच्या इतर तपशीलासंबंधीचा असतो. इंग्रजीत याला 'Collation' असे म्हणतात. ग्रंथासंबंधीची ही माहिती दुसऱ्या समासापासून (उभ्या रेषेपासून) लिहिली जाते.

**७. टीप विभाग :** यानंतर 'टीप' विभाग सुरू होतो. एका पेक्षा जास्त टीपा असल्यास प्रत्येक टिपेकरीता स्वतंत्र परिच्छेद केला जातो. टीप लिहिताना ती दुसऱ्या समासापासून लिहिली जाते. व ती मोठी असल्यास उर्वरीत भाग हा पुढच्या ओळीवर पहिल्या समासापासूनच लिहिला जातो.

**८. पूरक नोंदींची शीर्षके (Tracing) :** ह्याचा स्वतंत्र परिच्छेद (paragraph) केला जातो. यांचीही सुरूवात दुसऱ्या समासापासून होते. शीर्षक मोठे असल्यास उर्वरीत भाग खालच्या ओळीवर पहिल्या समासापासून लिहिला जातो. तालिका पत्राच्या छिद्राच्या वरच्या बाजूस ही शीर्षके लिहिली जातात. परंतु कित्येक ग्रंथालयांमध्ये पूरक नोंदींची शीर्षके (Tracing) मुख्य नोंदीच्या तालिका पत्रामागे पेन्सिलने लिहितात.

पहिला समास, दुसरा समास व तिसरा समास यासंबंधीची माहिती आपण ११ वी च्या पाठ्यपुस्तकात (पृष्ठ क्र. ५४) अभ्यासली आहे. तसेच आपण मुख्य नोंदीच्या प्रत्येक विभागात (उताऱ्यांमध्ये) ग्रंथांचे विविध घटक लिहिताना कोणत्या शुद्धलेखन चिन्हांचा वापर करून ते कसे लिहिले जातात यासंबंधीचा आराखडाही आपण ११ वीच्या पाठ्यपुस्तकांत (पृष्ठ क्र. ११५-११७) अभ्यासला आहे.

**९. चिन्हांविषयीचे नियम :** कोणत्या घटकासाठी कोणते चिन्ह त्या अगोदर लिहिले जाते. यासंबंधीचे नियम पुढील प्रमाणे:

**(i) ग्रंथ शीर्षक आणि लेखक :**

अ) ग्रंथाच्या मुख्य शीर्षकानंतर जर ग्रंथाचे समांतर शीर्षक लिहायचे असेल तर बरोबरचे चिन्ह "=" अगोदर लिहावे व नंतर समांतर शीर्षक लिहावे.

ब) ग्रंथाचे उपशीर्षक अथवा स्पष्टीकरणात्मक शीर्षक लिहिण्याअगोदर ":" हे चिन्ह वापरावे (ह्याला आपण मराठीत विसर्ग असे म्हणतो).

क) ग्रंथाचा पहिला लेखक लिहिताना ग्रंथाच्या

शीर्षकानंतर तिरकी रेषा "/" द्यावी आणि नंतर प्रथम लेखकाचे नाव लिहावे. एकापेक्षा जास्त लेखक असल्यास (तीन पर्यंत) इतर लेखकांची नावे अगोदर सेमीकोलन ";" (अर्धविराम) लिहून मग लिहावी.

**(ii) आवृत्ती विभाग :**

(अ) ग्रंथाची आवृत्ती पूर्णविराम, स्पेस, डॅश (आडवी रेषा), स्पेस " . – " अशी चिन्हे वापरून मग लिहावी.

(ब) जर ग्रंथांच्या अनेक आवृत्या प्रकाशित झाल्या असतील तर इतर आवृत्यांची माहिती लिहिण्याअगोदर स्वल्पविराम द्यावा– "," (comma).

(क) जर ग्रंथ संपादित केला असेल व संपादकाचे नाव ग्रंथाच्या शीर्षक पृष्ठावर दिलेले असेल तर आवृत्ती नंतर संपादकाचे नाव लिहिले जाते. संपादकाचे नाव लिहिण्यापूर्वी "/" (तिरकी रेषा दिली जाते).

(ड) एकापेक्षा जास्त संपादक असल्यास पहिल्या संपादकाच्या नावानंतर इतरांची नावे लिहिली जातात. ती लिहिताना अगोदर ";" सेमीकोलन (अर्ध विराम) दिला जातो.

**(iii) प्रकाशन विभाग :**

(अ) आवृत्ती विभागानंतर हा विभाग येतो. या विभागातील माहिती लिहिण्याअगोदर " . – " (फुलस्टॉप, स्पेस, डॅश, स्पेस) दिला जातो. नंतर ग्रंथाच्या प्रकाशनाचे स्थान लिहिले जाते. जर ग्रंथ अनेक ठिकाणाहून प्रकाशित झाला असेल तर पहिले स्थान नोंदीत नोंदीवले जाते. (इतर स्थानाविषयीची माहिती सेमीकोलन (अर्धविराम) ";" देऊन लिहिली जाते)

(ब) प्रकाशन स्थानानंतर प्रकाशकाचे नाव लिहिले जाते. हे लिहिण्याअगोदर कोलन (विसर्ग चिन्ह) ":" लिहिले जाते.

(क) प्रकाशकाच्या नावानंतर प्रकाशन वर्ष लिहिले जाते. हे लिहिण्याअगोदर स्वल्पविराम "," दिला जातो.

**(iv) ग्रंथाच्या वर्णनाविषयीचा भाग :** (Physical Description Area/Collation) ह्या भागाचे वर्णन नवीन परिच्छेदाने सुरूवात करून लिहिले जाते. (दुसऱ्या समासापासून).

(अ) ग्रंथाच्या इतर वर्णनाचा तपशील लिहिताना (आकार सोडून = उंची) अगोदर ":" (विसर्ग) हे चिन्ह वापरावे.

(ब) ग्रंथाचा आकार लिहिण्यापूर्वी (स्वल्पविराम) "," हे चिन्ह द्यावे.

(क) ग्रंथासोबत इतर माहितीचा विभाग अथवा साहित्य दिलेले असल्यास त्या विषयीची माहिती देताना (अधिक चिन्ह) "+" चे चिन्ह अगोदर लिहिले जाते.

(ड) ग्रंथाबरोबरच्या साहित्याविषयी काही अधिकचे स्पष्टीकरण (माहिती) द्यावयाचे असेल तर ते गोल कंसात "( )" दिले जाते.

**(v) मालाविभाग (series area) :**

(अ) माला विषयक माहिती लिहिण्याअगोदर पूर्णविराम, स्पेस, डॅश, स्पेस लिहून मग लिहावी. माले विषयीची माहिती गोल कंसात लिहावी.

(ब) मालेच्या लेखकाविषयी माहिती द्यावयाची असल्यास (संपादक, भाषांतरकार) अगोदर तिरकी रेषा (slash) "/" द्यावी.

(क) मालेचा क्रमांक लिहिताना अगोदर सेमीकोलन (अर्धविराम) ";" लिहावा.

**(vi) टीपा विभाग (Note area) :** ह्या विभागाची सुरूवात नवीन परीच्छेदाने होते (दुसऱ्या समासापासून). टीपांचा प्रत्येक नवीन विभाग नवीन परीच्छेदापासून सुरू होतो. टीप लिहून झाल्यावर शेवटी पूर्णविराम द्यावा.

**(vii) इतर शुद्धलेखन चिन्हे व त्यांचा वापर:** जर एखादया घटकाची (element) माहिती लिहिताना काही भाग वगळला असेल तर लिहिलेल्या भागानंतर "...." असे चिन्ह लिहिले जाते.

तसेच एखाद्या विभागाची माहिती ग्रंथात नसेल व इतरत्र कोठूनही त्या संबंधीची माहिती मिळाली तर ती माहिती चौकोनी कंसात लिहावी व त्या चौकोनी कंसात प्रश्नचिन्ह द्यावे. उदा., आवृत्ती वर्ष "[1989?]"

यानंतर शेवटी आयएसबीएन लिहिला जातो.

**(viii) तालिकीकरण करताना काही घटकांच्या बाबतीत लघुरूपे उपयोगात आणतात ती पुढीलप्रमाणे :**

| संज्ञा (शब्द) | लघुरूप |
|---|---|
| सेंटीमीटर | c.m. (से.मी.) |
| कंपनी | co. (कं.) |
| कंम्पायलर (संग्राहक) | comp. (संग्रा.) |
| कॉपीराइट | c. (सी.) |
| एडीशन (आवृत्ती) | ed. (आ.) |
| एनलार्ज (विस्तारित) | enl. (विस्ता.) |
| गव्हर्नमेंट (शासन) | govt. (शा.) |
| इलस्ट्रेशन (चित्रे) | ill. (चित्रे.) |
| नंबर (क्रमांक) | no. (क्रं.) |
| स्युडोनेम (टोपननाव) | pseud. (टो.ना.) |
| रिव्हाईज्ड (सुधारित) | rev. (सुधा.) |
| सिरीज (माला) | ser. (मा.) |
| ट्रान्सलेटर (भाषांतरकार) | tr. (भाषां.) |


**(ix) पृष्ठांची संख्या :**

ग्रंथाच्या पृष्ठांची संख्या लिहिताना प्राथमिक पृष्ठे ही रोमन आकड्यांमध्ये लिहिली जातात. मुख्य मजकूराच्या पृष्ठांची संख्या इंडो-अरेबिक आकड्यात लिहिली जातात. उदा., x, २५५ पृष्ठे.

**वरील माहितीच्या आधारे मुख्य नोंदीचा आराखडा**

पहिला समास (First Indention) — दुसरा समास (Second Indention) — तिसरा समास (Third Indention)

| | | |
|---|---|---|
| | मुख्य | नोंद शीर्षक |
| | | ग्रंथ शीर्षक/नाम=समांतर ग्रंथनाम : उपग्रंथनाम |
| वर्गांक | /लेखक. | - आवृत्ती / आवृत्तीशी संबंधित लेखक (संपा). - |
| ग्रंथांक | प्रकाशन स्थळ : | प्रकाशक अथवा वितरक, प्रकाशन वर्ष. |
| | | खंड (असल्यास) : ग्रंथाची पृष्ठे : चित्रे, रेखाचित्रे, आकृत्या |
| | इ.(असल्यास); | ग्रंथाचा आकार + ग्रंथासोबतचे साहित्य . _ |
| दाखल अंक | (माला शीर्षक | ; माला क्रमांक) |
| | | टीपा : |
| | | ISBN |


Main Entry

Author's name
Title proper : other title infomation / Statement of responsibility . - edition statement . - Place of publication : Publisher, Date of Publication.
Vols. , pg. numbers : illustrations , figures ; dimension . - (series ; series number)
Notes
ISBN
Tracing

Class no.
Book no.
Acc No.

**AACR-IIR (2005) च्या तालिका संहितेनुसार तालिकेची नियम**

**अेअेसीआर तालिका**

मुख्य नोंद व पूरक नोंदीतील फरक आपण इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकात अभ्यासला आहे. तसेच आपण एका लेखकाने लिहिलेल्या ग्रंथाच्या तालिका नोंदी कशा केल्या जातात तेही अभ्यासले आहे. या पाठ्यपुस्तकात आपण दोन लेखक, तीन लेखक, तीनपेक्षा जास्त लेखक व संपादित ग्रंथ या ग्रंथप्रकारांविषयी तालिका तयार करण्याच्या नियमांचा अभ्यास करणार आहोत.

**ग्रंथाचा लेखक निश्चित करण्यासंदर्भातील नियम**

अेअेसीआर-2R (2005) अद्ययावत आवृत्ती

1.1A2 : लेखकाचे नाव शीर्षक पृष्ठामधून अथवा ग्रंथात इतरत्र दिलले असेल तेथून ते घ्यावे.

1.1F1 : ग्रंथाच्या शीर्षक पृष्ठावर लेखकाचे नाव जसे दिले असेल तसे घ्यावे. (मात्र, मुख्य नोंदीतील नोंदीचे शीर्षक म्हणून आपण जेव्हा लेखकाचे नाव घेतो त्यावेळेस आडनाव अगोदर लिहावे. त्यानंतर स्वल्पविराम देऊन लेखकाचे स्वतःचे नाव व त्यानंतर वडिलांचे नाव या क्रमाने लिहावे.)

जर लेखकाचे नाव ग्रंथाव्यतिरिक्त इतर स्रोतांमधून (उदा., सूचीय साधने शोधून) घेतल्यास ते चौकोन कंसात लिहावे.

1.1F2 : जर लेखकाचे नाव शीर्षक पृष्ठावर अथवा ग्रंथात इतरत्र कोठेही त्याचा उल्लेख नसेल अथवा त्यातून ते प्राप्त होत नसल्यास व ते नोंदवणे

अत्यावश्यक असेल तर तालिकापत्राच्या शेवटच्या 'टीप' या भागात त्याचा उल्लेख करावा.

**1.1F3** : जर ग्रंथाच्या शीर्षक पृष्ठावर शीर्षकाअगोदर लेखकाने नाव छापलेले असेल व ते जर ग्रंथाच्या शीर्षकाचा अविभाज्य भाग असेल तर ते आहे तसेच शीर्षकाबरोबर लिहावे. अन्यथा, नियमानुसार तालिकानोंदीत योग्य त्या ठिकाणी लेखकाचे नाव लिहावे.

उदा., Marlow's Doctor Faustus

**1.1F4** : जर ग्रंथ दोन किंवा तीन लेखकांनी लिहिलेला असेल व ग्रंथातील आशयाची जबाबदारी समान असेल तर पहिल्या लेखकाच्या नावे मुख्य नोंद करावी व इतर दोन लेखकांच्या नावाने पूरक नोंदी कराव्यात.

**1.1F7** : लेखकाच्या नावाअगोदर त्यांच्या संदर्भात काही सन्मानदर्शक शब्द, पदवी दर्शवणारे शब्द, गुणवत्तादर्शक शब्द (Qualifications) असतील तर पुढील परिस्थितीत ते ठेवावेत.

(अ) अशी बिरुदे व्याकरणदृष्ट्या आवश्यक असतील. उदा., .... ; Prologo del Exemo. Sr.D.MannuelFraga Iribrane

(ब) जर केवळ व्यक्तीचे नाव अथवा आडनाव दिलेले असेल. उदा., ..... / by Miss Jane

..... / by Miss Read

..... / by DR Johnson

(क) असे सन्मानदर्शक शब्द त्या व्यक्तीची ओळख दर्शवण्यासाठी आवश्यक असेल तर...

..... / by Mrs.Charles H.Gibson

(ड) अथवा असे शब्द सन्मान दर्शवणारे असतील व ब्रिटिश संस्कृतीतील आदर दर्शवणारे असल्यास ते ठेवावे.

उदा., ..... / Anne Finch, Countess of Winchilsea

अन्यथा, असे शब्द गरज नसल्यास लेखकाच्या नावातून वगळावेत.

उदा.,

(१) एका लेखकाने लिहिलेला ग्रंथ

ग्रंथाचे शीर्षक/ग्रंथनाम (Title) : Introduction to Cataloguing and Classification

लेखक (Author) : Bohdan S.Wynar

आवृत्ती (Edition) : 6th

प्रकाशन स्थळ (Place of publication) : Littleton

प्रकाशक (Publisher) : Libraries Unlimited

प्रकाशन वर्ष (Year of Publication) : १९८०

ग्रंथपृष्ठे (Physical Description) : प्राथमिक पृष्ठे (Primary Pages) xvii, मुख्य पृष्ठे (Main Pages) : 657

ग्रंथाचा आकार (Height, size in cms) : 24 cm.


ग्रंथात चित्रे (illustrations) समाविष्ट आहेत.

बोधांक (call no.) 025.42/WYN

दाखल अंक (Acc No.) : 75560

ग्रंथ मालेत लिहिलेला आहे. मालेचे शीर्षक (Name of series) : Library Science Textbook Series

ग्रंथात सूची दिलेली आहे. (Includes bibliography)


Main Entry

Wynar, Bohdan S.
Introduction to Cataloguing and
025.42 Classification/Bohdan S.Wynar . -
WYN 6th ed. . - Littleton : Libraries
Unlimited, 1980.
xvii, 657 p. : ill. ; 24 c.m. . -
75560 (Library Science Textbook series)
Includes bibliography
ISBN 0-87287-221-1

Tracing
1. Library Science
2. Cataloguing and Classification
I. Title
II. Series

Introduction to Cataloguing and Classification
Wynar, Bohdan S.
Introduction to Cataloguing and
025.42 Classification/Bohdan S.Wynar . -
WYN 6th ed. . - Littleton : Libraries
Unlimited, 1980.
xvii, 657 p. : ill. ; 24 c.m. . -
75560 (Library Science Textbook series)
Includes bibliography

LIBRARY SCIENCE TEXTBOOK SERIES
Wynar, Bohdan S.
Introduction to Cataloguing and
025.42 Classification/Bohdan S.Wynar . -
WYN 6th ed. . - Littleton : Libraries
Unlimited, 1980.
xvii, 657 p. : ill. ; 24 c.m. . -
75560 (Library Science Textbook series)
Includes bibliography

CATALOGUING AND CLASSIFICATION
Wynar, Bohdan S.
Introduction to Cataloguing and
025.42 Classification/Bohdan S.Wynar . -
WYN 6th ed. . - Littleton : Libraries
Unlimited, 1980.
xvii, 657 p. : ill. ; 24 c.m. . -
75560 (Library Science Textbook series)
Includes bibliography

LIBRARY SCIENCE
Wynar, Bohdan S.
Introduction to Cataloguing and
025.42 Classification/Bohdan S.Wynar . -
WYN 6th ed. . - Littleton : Libraries
Unlimited, 1980.
xvii, 657 p. : ill. ; 24 c.m. . -
75560 (Library Science Textbook series)
Includes bibliography

**अ‍ॅथॉरिटी फाईल :** अ‍ॅथॉरिटी फाइल म्हणजे, "व्यक्ती, संस्था, माला (series) व विषयांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संज्ञा किंवा मालिकेत उपयोगात आणलेली शीर्षके यांची अधिकृत नोंद."

अ‍ॅथॉरिटी फाइल तयार करण्याची प्रक्रिया म्हणजे व्यक्तीनाम किंवा समष्टी संस्था, ग्रंथ शीर्षक किंवा योग्य विषय शीर्षक यांची तालिकेत नोंद करण्यासाठी योग्य स्वरूपात निवड करणे. अशा प्रकारच्या विविध नोंदीच्या घटकांची अनुवर्णक्रमानुसार रचना केली जाते अशा एकत्रित नोंदींना 'अ‍ॅथॉरिटी फाईल' असे म्हणतात.

'सियर्स लिस्ट ऑफ सब्जेक्ट हेडिंग्ज्', 'लायब्ररी ऑफ काँग्रेस सब्जेक्ट हेडिंग्ज्' किंवा विषय थिसॉरस ह्या सर्व विषयांशी संबंधित अ‍ॅथॉरिटी फाइल्स आहेत. अ‍ॅथॉरिटी फाईल्सचे पुढील तीन प्रकार सांगता येतील:

(i) व्यक्ती व संस्था नाम अ‍ॅथॉरिटी फाइल. (उदा., लायब्ररी ऑफ काँग्रेसची नेम अ‍ॅथॉरिटी फाईल)

(ii) विषय अ‍ॅथॉरिटी फाइल. (उदा., सियर्स लिस्ट ऑफ सब्जेक्ट हेडिंग्ज)

(iii) मालाविषयक (series) अ‍ॅथॉरिटी फाइल.

**नियम क्रमांक 21.6B** दोन किंवा तीन लेखकांनी लिहिलेला ग्रंथ: ग्रंथाच्या शीर्षक पृष्ठावर ज्या क्रमाने लेखकांची नावे दिलेली असतील त्यातील लेखकाच्या नावाने मुख्य नोद करावी. दुसऱ्या व तिसऱ्या लेखकाच्या नावे पूरक नोंदी कराव्यात.

जर ग्रंथाचे लेखक दोन किंवा तीन असतील तेव्हा मुख्य नोंदीचा आराखडा पुढीलप्रमाणे असेल. उदा.,

Title : Library and Information Center Management

Author : Robert D. Stueart

Barbara B. Moran

Edn. : 6th, 2012

Publisher : Libraries Unlimited

A Division of Greenwood Publishing Group, Inc.

Place : Greenwood Village, Colorado

Pages : xxv, 494 p., Size : 25 cm.

Includes Bibliography and Index

ISBN : 1-56308-986-6

Class No. : 025.1
STU

Acc. No. : 102056

Subject Headings :

i) Library Science, Library Administration

ii) Library Science

Main Entry
Stueart, Robert D.
Library and Infomation Center Management /
025.1 Robert D. Stueart and Barbara B. Moran . - 6th ed.
STU . - Greenwood Village, Colorado : Libraries
Unlimited , A division of Greenwood Publishing
Group, Inc., 2012.
xxv, 494 p ; 25 cm.
102056 Includes bibliography
ISBN 1-56308-986-6

Tracing
1. Library administration
2. Library Science
3. Title
II. Moran, Barbara B.

Added Entry
Moran, Barbara B.
Stueart, Robert D.
Library and Infomation Center Management /
025.1 Robert D. Stueart and Barbara B. Moran . - 6th ed.
STU . - Greenwood Village, Colorado : Libraries
Unlimited , A division of Greenwood Publishing
Group, Inc., 2012.
xxv, 494 p ; 25 cm.
102056 Includes bibliography

वि.शी.नोंद
LIBRARY ADMINISTRATION
Stueart, Robert D.
Library and Infomation Center Management /
025.1 Robert D. Stueart and Barbara B. Moran . - 6th ed.
STU . - Greenwood Village, Colorado : Libraries
Unlimited , A division of Greenwood Publishing
Group, Inc., 2012.
xxv, 494 p ; 25 cm.
102056 Includes bibliography

LIBRARY SCIENCE
Stueart, Robert D.
Library and Infomation Center Management /
025.1 Robert D. Stueart and Barbara B. Moran . - 6th ed.
STU . - Greenwood Village, Colorado : Libraries
Unlimited , A division of Greenwood Publishing
Group, Inc., 2012.
xxv, 494 p ; 25 cm.
102056 Includes bibliography

LIBRARY AND INFORMATION CENER
Stueart, Robert D.
Library and Infomation Center Management /
025.1 Robert D. Stueart and Barbara B. Moran . - 6th ed.
STU . - Greenwood Village, Colorado : Libraries
Unlimited , A division of Greenwood Publishing
Group , Inc., 2012.
xxv, 494 p ; 25 cm.
102056 Includes bibliography

**नियम क्र.1.1F5 :** जर ग्रंथ तीनपेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेला असेल तर मुख्य नोंद ही ग्रंथाच्या शीर्षकाने केली जाते. नोंदीची सुरुवात ग्रंथ शीर्षकाने

होते. याकरिता लंब समासाच्या (Hanging idention) साहाय्याने नोंद केली जाते. तसेच लेखक म्हणून फक्त पहिल्या लेखकाचा उल्लेख केला जातो व त्याच्या पुढे '....' असे चिन्ह ठेवून पुढे चौकोनी कंसात [et al.] असे लिहिले जाते. तसेच पहिले नाव असलेल्या लेखकाच्या नावे पूरक नोंद करावी. अथवा तीपेक्षा जास्त समष्टी ग्रंथकार असल्यास पहिल्या समष्टी ग्रंथकाराचा (corporate body) उल्लेख करावा व ... [et al.] असे लिहावे.

उदा., America's radical rights/ Raymond Wolfinger ... [et al.]

तीनपेक्षा जास्त लेखक असलेल्या ग्रंथाचे उदाहरण.

Title : Librarianship : an introduction

Authors : G.G.Chowdhury, Paul F. Burton, David McMenemy and Alan Poulter

Publisher : Facet Publishing

Place of Publication : London, Year : 2008

Pages : Preliminary - xviii, Main pages - 329

Includes bibliography and index

Class No. : 020/CHO Acc No. 20512

ISBN : 978-1-85604-617-6

Subject Heading : LIBRARY AND INFORMATION SCIENCE

Main Entry

Librarianship : an introduction / G. G.
Chowdhury ... [et al.] . - London :
020 Facet Publishing, 2008
CHO xviii, 329p. ; 24 c.m.
ISBN 978-1-85604-617-6

20512

Tracing
1. Library Science
I. Chowdhury, G.G. ... [et al.]

LIBRARY SCIENCE
Librarianship : an introduction / G. G.
Chowdhury ... [et al.] . - London :
020 Facet Publishing, 2008
CHO xviii, 329p. ; 24 c.m.
ISBN 978-1-85604-617-6

20512

Chowdhury, G.G. ... [et al.]
Librarianship : an introduction / G. G.
Chowdhury ... [et al.] . - London :
020 Facet Publishing, 2008
CHO xviii, 329p. ; 24 c.m.

20512

**नियम क्र. 1.2C :** या संदर्भात अेअेसीआर2R, २००५ च्या आवृत्तीत विविध स्वरूपाच्या संपादित ग्रंथाकरिता अनेक उपनियम दिलेले आहेत. परंतु, आपण केवळ एकाच प्रकारच्या संपादित ग्रंथाच्या तालिकीकरणाचा नियम अभ्यासणार आहोत.

**नियम क्र. 1.2C1 :** संपादित ग्रंथाच्या अनेक आवृत्त्यांच्या संपादकांची नावे दिलेली असली तरी केवळ नवीन (Latest) आवृत्तीच्या संपादकाचा उल्लेख तालिका नोंदीत करण्यात यावा. संपादित ग्रंथाची मुख्य नोंद ग्रंथशीर्षकाने केली जाते.

संपादित ग्रंथाच्या तालिकेचे उदाहरण पाहू या.

Title : Handbook of Information

management, 8th edition
Editor : Alison Scammell
Publisher : Aslib-IMI,
Place : London, 1988
Physical description : Preliminary pages : xviii,
Main pages : 546
Size : 23 c.m.
Includes index, ISBN 085142 457 0
Class No. 025.04 Book No. SCA
Acc No. : 10940

Subject Headings : (i) Information storage and retrieval (ii) Information management (iii) Library Science

Main Entry
Handbook of Information Management / edited by
Alison Scammell . - 8th ed., - London : Aslib
025.04 - IMI, 1988.
SCA xviii, 546 p. ; 23 c.m.
Includes index
ISBN 978-1-85604-617-6
Tracing
10940 (1) Infomation storage and retrieval
(2) Information Management
(3) Library Science
I. Scammell, Alison, ed.

INFOMATION STORAGE AND RETRIEVAL
Handbook of Information Management / edited by
Alison Scammell . - 8th ed., - London : Aslib
025.04 - IMI, 1988.
SCA xviii, 546 p. ; 23 c.m.
Includes index
10940

INFOMATION MANAGEMENT
Handbook of Information Management / edited by
Alison Scammell . - 8th ed., - London : Aslib
025.04 - IMI, 1988.
SCA xviii, 546 p. ; 23 c.m.
Includes index
10940

LIBRARY SCIENCE
Handbook of Information Management / edited by
Alison Scammell . - 8th ed., - London : Aslib
025.04 - IMI, 1988.
SCA xviii, 546 p. ; 23 c.m.
Includes index
10940

Scammell, Alison, ed.
Handbook of Information Management / edited by
Alison Scammell . - 8th ed., - London : Aslib
025.04 - IMI, 1988.
SCA xviii, 546 p. ; 23 c.m.
Includes index
10940

**1.1F :** मुख्य नोंदीचा आराखडा (तीनपेक्षा जास्त व्यक्तींनी ग्रंथ लिहिलेला असेल व लेखकाविषयीची (Statement of Responsibility) माहिती ग्रंथाच्या शीर्षक पृष्ठाच्या साहाय्याने निश्चित होऊ शकत नसल्यास) अशा वेळेस लंब (हँगिंग) समासाचा उपयोग केला जातो. त्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे :

ग्रंथ तीनपेक्षा जास्त लेखकांनी लिहिलेला
असल्यास नोंदीचा आराखडा
ग्रंथशीर्षक : उपशीर्षक/पहिला लेखक ; इतर लेखकांची
माहिती . – आवृत्ती . – प्रकाशन स्थळ : प्रकाशक,
वर्गांक प्रकाशन वर्ष.
ग्रंथांक खंड, ग्रंथ पृष्ठे, प्राथमिक + मुख्य पृष्ठे ; ग्रंथाचा आकार
. – (माला विषयक नोंद ; मालेचा क्रमांक).
दाखल अंक टीपा
आयएसबीएन
शोध घटक (Tracing)

तीन लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथाचे उदाहरण
Title : Human Development
Authors : Thomas L. Crandell, Corrine Haines Crandell, James W.Vander
Edition : Ninth edition
Publisher : McGraw Hill

Place : Boston
Year of Publication : 2009
Pagination : xx, 651 p., Size : 24 cm
Includes Bibliography, Index, Glossary
Class No. 155/CRA, Acc No. 124691

Main Entry

Crandell, Thomas L.
Human development / Thomas L. Crandell,
155 Carrine Haines Crandell, James W.Vander . -
CRA 9th ed. . - Boston : McGraw Hill, 2009
xx, 651 p. ; 24 cm.
Includes bibliography, index, glossary

124691

---

Tracing
1. Development psychology
2. Psychology
I. Crandell, Carrine Haines
II. Vander, James W.
III. Title

---

DEVELOPMENTAL PSYCHOLOGY
Crandell, Thomas L.
Human development / Thomas L. Crandell,
155 Carrine Haines Crandell, James W.Vander . -
CRA 9th ed. . - Boston : McGraw Hill, 2009
xx, 651 p. ; 24 cm.
Includes bibliography, index, glossary

124691

---

PSYCHOLOGY
Crandell, Thomas L.
Human development / Thomas L. Crandell,
155 Carrine Haines Crandell, James W.Vander . -
CRA 9th ed. . - Boston : McGraw Hill, 2009
xx, 651 p. ; 24 cm.
Includes bibliography, index, glossary

124691

---

Crandell, Carrine Haines
Crandell, Thomas L.
Human development / Thomas L. Crandell,
155 Carrine Haines Crandell, James W.Vander . -
CRA 9th ed. . - Boston : McGraw Hill, 2009
xx, 651 p. ; 24 cm.
Includes bibliography, index, glossary

124691

---

Vander, James W.
Crandell, Thomas L.
Human development / Thomas L. Crandell,
155 Carrine Haines Crandell, James W.Vander . -
CRA 9th ed. . - Boston : McGraw Hill, 2009
xx, 651 p. ; 24 cm.
Includes bibliography, index, glossary

124691

## स्वाध्याय

(१) तीनपेक्षा जास्त संपादकांनी संपादित केलेला ग्रंथ.

Title : Information Retrieval Research

Editors : R.N.Oddy, S.E.Robertson, C.J.van Rijsbergen, P.W.Williams

Publisher : Butterworths, Place : London, 1981

Physical description (Collation) : x , 389 p., 26 cm.

ISBN : 0-408-10775-8, Includes index

Class No. 025.04, Book No. ODD

Acc No. 24542

Subject headings : 1. Information Storage and Retrieval - Collection of articles

२. शीर्षक : वादळ माथा
लेखक : राम प्रधान
प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस
प्रकाशस्थळ : पुणे,
प्रकाशन वर्ष : २००१ (तिसरी आवृत्ती)
प्राथमिक पृष्ठे : xii,
मुख्य मजकुराची पृष्ठे : २६४
ISBN : 81-7766-118-3
बोधांक : 920.71 / CHA/PRA
दाखल अंक : 14451
उंची : २३ सेंमी

३. शीर्षक : साहित्याने मला काय दिले?
संपादक : डॉ.स्नेहल तावरे, प्रा.आरती दातार
प्रकाशक : स्नेहवर्धन प्रकाशन
प्रकाशन स्थळ : पुणे, प्रकाशन वर्ष : १९९०
प्राथमिक पृष्ठे : viii, १८७ पृष्ठे
वर्गांक : 891.464 ग्रंथांक : TAV/DAT
दाखल अंक : 8210 उंची : २३ सेंमी.
आयएसबीएन = ?

४. शीर्षक : सूर्यमालेची कहाणी
संपादक : निरंजन घाटे
प्रकाशक : प्रमोद प्रकाशन, पुणे
प्रकाशन वर्ष : १९८९ प्रथमावृत्ती
प्राथमिक पृष्ठे : iv,
मुख्य मजकुराची पृष्ठे : १३८
वर्गांक : 520 ग्रंथांक : GHA
दाखल अंक : 69539
आकार : १८ सेंमी.
आयएसबीएन = ?

५. शीर्षक : साहित्याचे तत्त्वज्ञान
लेखक : विनायक नारायण ढवळे
प्रकाशक : कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
प्रकाशन वर्ष : १९८४, प्रकाशन स्थळ : पुणे
वर्गांक : 801 ग्रंथांक : DHA
दाखल अंक : 44420
उंची (आकार) : २२ सेंमी.
पृष्ठे : २०५

६. शीर्षक :- ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव
लेखक : आनंद यादव
प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस
प्रकाशन स्थळ : पुणे, वर्ष : १९८१
वर्गांक : 891.460 9 ग्रंथांक : YAD
दाखल अंक : 42919
प्राथमिक पृष्ठे - iv, मुख्य पृष्ठे : १५५
उंची : २२ सेंमी.

७. शीर्षक : भारतीय इतिहास : प्राचीन ते अर्वाचीन
लेखक : स्मिता जोशी
प्रकाशक : डायमंड पब्लिकेशन्स
प्रकाशन स्थळ : पुणे वर्ष : २०१३
प्राथमिक पृष्ठे : v, ६३९
वर्गांक : 954 ग्रंथांक : JOS
दाखल अंक : 122220
उंची : २० सेंमी.

८. शीर्षक : मरणाची तमा कुणाला =
डेथ बी नॉट प्राउड या जॉन गुंथर यांच्या
कादंबरीचे भाषांतर. दुसरी आवृत्ती
लेखक : पुरुषोत्तम धाक्रस
प्रकाशक : पद्मगंधा प्रकाशन
प्रकाशन स्थळ : पुणे, वर्ष : २००४
वर्गांक : 891.463
ग्रंथांक : GUN/DHA/DEA
दाखल अंक : 16344
पृष्ठे : xviii, १५० पृष्ठे
आकार : २२ सेंमी.
आयएसबीएन = ?